Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 195 – 200
DOI: 10.5281/zenodo.10115366

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींच्या विचारातील तीन स्तंभ (सत्याग्रह, अहिंसा व खादी)

प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम

प्राचार्य, एस. बी. आर कॉलेज म्हसवड, जि. सातारा ४१५५०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: stkadam75@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधी हे युगपुरुष होते. राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ आक्टोंबर, १८६९ रोजी गुजरात येथील कोठेवाडी पोरबंदर या शहरी झाला. महात्मा गांधींना अगदी बालपनापासूनच धार्मिक संस्काराचा प्रभाव होता. अनेक धार्मिक गोष्टी हया बालपणात त्यांच्या माता पुतलीबाई यांच्याकडून अवगत झाल्या. गांधीजी हे नम्र, आज्ञाशिल, नैतिकवादी विचारांचे व्यक्ती होते. अशा हया राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर अनेक अशा विख्यात धर्मग्रंथांचा प्रभाव होता. यात भगवदगिता, कुराण, येशू ख्रिस्ताचे पर्वतावरील प्रवचन, बौद्ध धर्माचे तत्वज्ञान तसेच जैन धर्म अशा धार्मिक ग्रंथांचा फार मोठा प्रभाव गांधीजींवर होता. यासोबतच जगातीलअनेक थोर मोठे व्यक्ती यात थोरो, जॉन रस्कीन, टॉलेस्टाय, कार्ल मार्क्स, गोपाळकृष्ण गोखले इत्यादी व्यक्तीचे नावे सांगता येतील अशा अनेक साहित्यातून, ग्रंथातून व अनेक जगातील विख्यात व्यक्तींच्या विचारातून गांधीजीचे एक आगळे वेगळे व्यक्तीमत्व उभारले. आज संपूर्ण जगाला गांधी गांधीजींच्या विचारांनी प्रभावशाली केले. गांधीजींच्या जीवनात अनेक आंतरराष्ट्रीय घटना, राष्ट्रीय घटना तसेच स्थानिक घटना यांच्या प्रभावातून प्रतिकारात्मक नैतीकतावाद उदयास येऊन् अशा सनदशीर मार्गानेच गांधीजीने प्रत्येक समस्यांची सोडवणूक केली. संपुर्ण गांधीवादी विचार हे अहिंसा, सत्याग्रह व खादी या मुल तत्वावर आधारीत आहे.गांधीजीच्या राजकीय तत्वज्ञानाची अहिंसा, सत्याग्रह व असहकार ही निश्चित व मुलभुत वैशिष्टये आहेत. गांधीजींचे कार्य हे मानवतावादी कार्य होते.

**सत्याग्रह**

'सत्याग्रह' या शब्दांचा मूळ अर्थ सत्य+आग्रह म्हणजेच सत्याचा आग्रह करणे. अन्याय, अत्याचार, शोषण करणाऱ्यांच्या विरोधात कोणताही वैरभाव, सूळ आणि द्वेष न बाळगता आपल्या हक्क आणि न्यायकरीता सत्याच्या मार्गात्र ठाम राहून सत्याग्रह करणे होय.

गांधीजीनी सर्व प्रथम 'सत्याग्रह' या शास्त्राचा उपयोग ट्रासवाल, दक्षिण, दक्षिण आफ्रिका (१९०६) येथे केला. सत्याग्रहांचा मुख्य उद्देश स्वत: कष्ट सहन करुन निर्धारित लक्षापर्यंत पोहचने हे होय. गांधीजीसाठी 'सत्याग्रह' अशी एक जीवनपद्धती होती की, सत्याकरीता जीवन जगणे अभिप्रेत होते. गांधीजीच्या प्रत्येक रोमारोमात सत्य आणि अहिंसा अशा प्रकारे भिनले होते की, त्यांना विसाव्या शतकातील 'देवदूत' म्हटले, तरी वावगे होणार नाही.

वस्तूत सत्याग्रहाचा जन्म दक्षिण आफ्रिकेत इंग्रजानी ऐशियाई लोकांवर जो काळा कायदा लादलेला होता. त्याद्वारे भारतीय लोकांना आपल्या बोटांची छाप रजिस्टर मध्ये नोंदवावी लागत असे, अशा स्वरुपाची व्यवस्था मात्र इंग्रजांकरीता नव्हती. एक प्रकारे हा कायदा 'काळा आणि गोरा' रंगभेद दर्शविणारा होता. या काळया कायद्याच्या विरोधात महात्मा गांधीनी सर्व गैर युरोपियन लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. तो पावतो या आंदोलनाला विशेष संज्ञा नव्हती. मगनलाल गांधीनी या आंदोलनाला नाव सुचविले ते म्हणजे 'सदाग्रह' स्वत: महात्मा गांधीनी त्यात बदल करुन 'सत्याग्रह' असे नाव ठेवले. जे आंदोलन सत्य व अहिंसेवर आधारित असेल. गांधीजीच्या या अनोख्या सत्याग्रहाची किर्ती सर्वदूर पसरली. शेवटी सात-आठ वर्षाच्या दिर्घ लढ्यानंतर दक्षिण आफ्रिकन सरकारला ह्या सत्याग्रहासमोर नतमस्तक व्हावे लागले. भारतीयांना खऱ्या अर्थाने गांधीनी न्याय मिळवून दिला. ह्याच  स्वरुपाच्या सत्याग्रहाचा अवलंब गांधीनी १९१४ नंतर ते भारतात परतल्यावर केल्याचे दिसून येते. भारतातील शोषित, अन्यायग्रस्त, शेतकऱ्यांना, कामगारांना संघटित करण्याचे कार्य व त्यांच्या अन्यायाला वाचा फोडून देण्याकरीता महात्मा गांधीनी सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, अहमदाबाद  येथील मील मजदूरांचा सत्याग्रह, बार्डोली सत्याग्रह आणि मिठाचा सत्याग्रह गांधीजीच्या मिठाच्या सत्याग्रहाची नोंद तर जगातील दहा प्रमुख घटनांमध्ये झाल्याचं दिसून येते.

१९३० मध्ये टाईम मॅगजीनने महात्मा गांधीजीची 'टाईम पर्सन ऑफ दी ईयर' म्हणून निवड केली. इतके महत्व गांधीजीच्या सत्याग्रहाला होते. मीठाच्या सत्याग्रहातील आंदोलनकर्त्याची सहनशक्ती, अनुशासन, आत्मनियंत्रण बघून संपूर्ण जग विस्मयंचकित झाले होते. प्रत्यक्षदर्शी म्हणून अमेरिकन पत्रकार बेब मिलर यांनी या घटनेचे वर्णन केले होते. अशी अदभूत शक्ती महात्मा गांधीजीच्या सत्याग्रहात होती की, ज्याद्वारे देश स्वातंत्र्याकडे अग्रेसर झाला.

**गांधीजींचे अहिंसे विषयक विचार**

आचाराने, विचाराने अथवा उच्चाराने कोणालाही न दुखावणे तसेच क्रोधामुळे, स्वार्थामुळे किंचा सुडबुद्धीने कोणत्याही प्राणी मात्राला ईजाह न करणे हा गांधीजींच्या अहिंसा तत्वाचा व्यापक अर्थ होता. गांधीजींची अहिंसा म्हणजे बलाढय, हिंस्त्र सत्तेपुढे अन्यायाच्या दृष्ट प्रवृत्तीचा प्रतिकार करण्यासाठी आपल्या संपूर्ण आत्मबळाचा पुरेपुर केलेला

उपयोग होता. सामाजिक, राजकीय बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने अहिंसा हे निश्चितपणे एक शक्तीशाली शस्त्र ठरु शकते.

बौद्धिक व नैतिक गैरवर्तन म्हणजे हिंसा होय असे गांधीजींचे मत होते. या सर्वांपासून मुक्त होणे म्हणजे अहिंसेचा मार्ग होय. गांधीजींची अहिंसेची कल्पना नैतिक होती. सत्याचा शोध घेत असतानाच त्यांना त्यांना अहिंसारुपी रत्न सापडलेले दिसते. गांधीजीनी अहिंसेचे चार प्रकार सांगितले आहेत.

१. विधायक अहिंसा : दुसऱ्यावर प्रेम करुन त्यांच्या सुखासाठी झटणे, प्रत्येक जिवाचे एक प्रकारचे कल्याण करण्यासाठी या प्रकारची अहिंसा स्विकारावी लागते. उदा. दुर्बलांचा, स्त्रीयांचा उपमान न करणे, कोणालाही न फसवणे, प्राण्याची हिंसा न करणे.

२. निषेधात्मक अहिंसा : विचारांद्वारे, कार्याद्वारे किंवा शब्दांद्वारे इतरांना कष्ट पोहचू नयेत. स्वार्थ तिरस्कार व दुष्टपणा हयामुळे कोणालाही दु:ख न देणे म्हणजेच निषेधात्मक अहिंसा होय. उदा. इतरांविषयी आपल्या मनातील घृणा.

३. निरपेक्ष अहिंसा : धर्माचे पुर्णपणे पालन करणे म्हणजे निरपेक्ष अहिंसा प्राणीमात्रांच्या सुख-दु:खात सहभागी असणे त्यांची हत्या न करणे, शाकाहारी असणे.

४. नैतिक अहिंसा : ही अहिंसा व्यक्ती आपले जिवन जगत असताना पाहावयास मिळते. नैतिक अहिंसेचे गांधीजीनी तीन उपप्रकार सांगितले आहेत.

अ वीर पुरुषांची अहिंसा : नैतिक धारणा व आंतरिक विश्वास हयातून ही निर्माण होते. पर्वत हलविण्याची शक्ती हया अहिंसेत असते. ही सर्वात श्रेष्ठ अहिंसा होय.

आ दुर्बलांची अहिंसा : निश्चित परिणामकाकडे जाण्याचे साधन म्हणजे दुर्बलांची अहिंसा स्वत:मधील दुबलेपणामुळे अशी अहिंसा नाईलाजाने स्विकारावी लागते. हिंसा करणे शक्य होत नसल्याने या अहिंसेचा स्विकार केला जातो.

इ भित्र्या व्यक्तीची अहिंसा : जेव्हा व्यक्तीत परिस्थितीचा सामना करण्याचे धैर्य नसते तेव्हा ती व्यक्ती घाबरुन अहिंसेचा आश्रय घेते. ही अहिंसा मनुष्याला न शोभणारी आहे असे गांधीजी म्हणतात.

**गांधीजींचे खादी विषयक विचार**

गांधीजींनी जीवनात स्वदेशाला महत्वाचे स्थान दिले व त्याचाच एक भाग म्हणजे खादी होय. सन १९०८ पर्यंत मी चरखा किंवा माग नजरेने पाहिला असल्याचे मला स्मरत नाही, तरीही 'हिंद स्वराज्य' मध्ये चरख्यानेच हिंदुस्थानचे दारिद्रय दूर होईल असे मी विधान केले. ज्या साधनांनी अपासमार टळेल त्याच मार्गाने स्वराज्यही मिळेल, ही कोणाच्याही लक्षात येण्यासारखी गोष्ट आहे. सन १९९५ मध्ये दक्षिण आफ्रिकेहून स्वदेशी आलो, तेव्हाही चरखा पाहायला मिळाला नव्हता. आश्रय स्थापला तेव्हा तेव्हा हातमाग सुरु केला. तो सुरु करताना मला खूप अडचणी आल्या.

आम्ही सर्व अनभिज्ञ, त्यामुळे माग आणला तरी तेवढ्यानेच तो चालेल असे नव्हते. आम्ही सर्व कलमबहाद्दर किंवा व्यापार जाणणारे एकत्र जमलो होतो. आमच्या पैकी कारागीर असा कोणीच नव्हता. त्यामुळे माग मिळविल्यानंतरही विणकाम शिकविण्याची आवश्यता होती. काठेवाड व पालणपूर येथून माग मिळाला व एक शिकविणारा आला. त्याने आपले सर्व कसब दाखविले नाही पण मगनलाल गांधी हाती घेतलेले काम एकाएकी सोडून देणारे नव्हते. त्यांच्या हातामध्ये कारगिरी तर होतीच, यामुळे त्यांनी विणकामाची कला पूर्णपणे समजून घेतली व नवे विणकर एकामागून एक आश्रमामध्ये तयार झाले. आम्हांला स्वत:चे कपडे स्वत:चे कपडे स्वत:तयार करुन वापरायचे होते. त्यासाठी आता गिरणीचे कापडे वापरण्याचे बंद केले आणि देशी गिरण्यांच्या सुताचे हातमागावर विणलेले कापडे वापरण्याचा आश्रयवासीयांनी ठराव केला. तसे करण्यापासून आम्हाला पुष्कळ शिकायला मिळाले. हिंदुस्थानातील विणकरांची राहणी, त्यांच्या कामाचा व्याप, सुत मिळण्याबाबत त्यांना येणाऱ्या अडचणी, त्यात त्यांची होणारी फसवणूक व अखेरीला त्यांचा दिवसेंदिवस वाढत जाणारा कर्जबाजारीपणा इत्यादी गोष्टींची माहिती मिळाली. आम्ही स्वत: आम्हांला लागणारे सर्व कापड ताबडतोब विणून घेऊ शकू, अशी स्थिती नव्हती. त्यामुळे बाहेरच्या विणकरांपासून आम्हाला जरुर तेवढे कापड विणवून घ्यावे लागत असे, कारण देशी गिरण्यांच्या सुताचे हाताने विणलेले कापड विणकरांकडून वाटेल तेव्हा मिळू शकेल, अशी सोय नव्हती, विणकर सर्व उंची कापड विलायती सुताचेच विणीत असत, कारण देशी गिरण्यांमध्ये बारीक सूत निघत नसे, आजही बारीक सूत थोडेच निघते, फार बारीक निघू शकतच नाही. मोठ्या मुश्किलीने काही विणकर आमच्या हाती लागले ते मोठी मेहेरबानी म्हणून देशी सुताचे कापड विणून देण्यास कबूल झाले. देशी सुताचे कापड निघेल ते विकत घेण्याचे वचन त्या विणकरांना आश्रमातर्फे द्यावे लागले होते. अशा तऱ्हेने कापड मुद्दाम विणवून घेऊन आम्ही वापरु लागलो व मित्रांमध्येही त्याचा प्रचार केला.

**खादीचा स्विकार**

खादी हा एक वादग्रस्त विषय आहे. पुष्कळ लोकांना असे वाटते की, खादीचा पुरस्कार करण्यात मी वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने नाव हाकारीत आहे आणि स्वराज्याची नौका माझ्या हातून नक्की बुडणार आहे तसेच मी देशाला अंधकार युगाकडे मागे ओढून नेत आहे. या छोट्याश्या निबंधात खादीच्या मुद्देसुद मांडणी करण्याचा माझा विचार नाही. मी ती इतरत्र पुरेशा प्रमाणात केलेली आहे. येथे केवळ कॉंग्रेसवाद्याला, किंबहुना प्रत्येक भारतवासीयाला, खादी कार्याची प्रगती करण्याच्या कामी काय करता येईल एवढेच मला दाखवायचे आहे.

खादी ही देशातील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या प्रारंभाची सूचक आहे. पक्वान्नाची परिक्षा ते खाल्ल्याने होत असते. प्रत्येक स्त्री-पुरुषाने ही गोष्ट अजमावून पाहावी, म्हणजे माझ्या म्हणण्यात कितपत तथ्य आहे त्याची त्याला किंवा तिला स्वानुभवाने प्रचीती येईल. खादीचा स्वीकार करावयाचा म्हणजे तिने सूचित होणाऱ्या सर्व गोष्टींचा स्विकार केला पाहिजे. खादी म्हणजे सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती, जीवनाच्या सर्व गरजा हिंदुस्थानातूनच आणि त्याही खेड्यातील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करुन भागविण्याचा कृतीनिश्चय. आज चालू असलेल्या प्रवाहाला उलटा वाहायला लावण्याचा हा प्रश्न आहे. म्हणजे आज जी हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटनमधील सात-पाच शहरे हिंदुस्थानातील

सात लक्ष खेड्यांचे शोषण व विनाश करुन जगत आहेत, त्याच्याऐवजी ती खेडी बव्हंशी स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील आणि स्वच्छेने दोन्ही पक्षांना लाभदायक होतील, अशा तऱ्हेने हिंदुस्थानातील शहरांच्या आणि बाहेरील जगाच्याही उपयोगी पडतील. शिवाय खादी मनोवृत्ती म्हणजे जीवनाला आवश्यक अशा वस्तुंच्या उत्पादनाचे व विभागणीचे विकेंद्रीकरण होय. यासाठी आतापर्यंत आपण या सिद्धांतापर्यंत येऊन पोहोचलो आहोत की, प्रत्येक खेड्याने स्वत:ला लागणाऱ्या सर्व वस्तू निर्माण करुन, खेरीज शहरांच्या गरजा भागवण्यासाठी अमूक टक्के जादा वस्तू तयार कराव्यात. मोठमोठाल्या यंत्रोद्योगांचे तर अवश्यमेव केंद्रीकरण करुन त्यांना राष्ट्राच्या मालकीचे करावे लागतील. परंतु ही विराट राष्ट्रीय प्रवृत्ती मुख्यत्वेकरुन खेड्यातच चालणार असल्यामुळे तिचा फारच थोडा अंश या मोठ्या उद्योगधंद्यांनी व्यापला जाईल. खादी ग्रामोद्योगामुळे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी होवू शकते. गावातील गरीबी ग्रामीण उद्योगामुळे कमी होण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्याला त्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी व जीवन मान उंचविण्यासाठी खादी ग्रामोद्योग उपयोगी पडू शकतो. त्याचा परिणाम शहरी भागात होणारे लोकांचे स्थानांतरण रोखता येईल व गावातील गरजा ह्या गावातच पूर्ण करता येतील. मनुष्याबरोबर घरातील गृहीणीला सुद्धा या उद्योगात काम करता येईल. खादी वापरल्यामुळे ग्रामीण विकास साध्य करता येईल व रोजगार उपलब्ध होण्याचा मोठा मार्ग खादी ग्रामोद्योग हा असेल. खादी ग्रामोद्योगामुळे गावाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. तसेच नैसर्गिक संससाधनाचा उचित उपयोग करता येईल. वरील सर्व सारांश पाहता महात्मा गांधीचा खादी आणि ग्रामोद्योगाचा दृष्टिकोण खऱ्या अर्थाने खेड्यांचा व देशाच्या संपूर्ण विकासाकरीता होता.

**समारोप**

महात्मा गांधीजीनी आपल्या आयुष्यामध्ये जेवढे कमवले, जेवढी कीर्ती संपादन केली, जे प्रेम मिळविले, तेवढे कोणत्याही महापुरुषाने क्वचितच मिळविलेले आपल्याला दिसून येईल. 'माझ्या स्वप्नातील भारत' या पुस्तकामध्ये गांधीजी लिहितात, माझ्या स्वप्नातील स्वराज्य हे गरिबांचे स्वराज्य आहे. जोपर्यंत गरिबांच्या आवश्यक गरजा पुर्ण करण्याची व्यवस्था होणार नाही. त्याला खऱ्याअर्थाने स्वराज्य म्हणता येणार नाही. श्रीमंत आणि गरीब ह्यांच्या मध्ये जी मोठी दरी निर्माण झालेली आहे ती जो पर्यंत पार करता येणार नाही तो पर्यंत राजव्यवस्थेचा कार्यकाल परिणामकारक होणे शक्य नाही. असे गांधीजी चे विचार होते. प्रगती म्हणजे माणसाने स्वत:ला ओळखणे, त्यासाठी इंद्रिय व मन यावर संयम ठेवायला पाहीजे. आपल्या इंद्रियावर ताबा मिळवून आपले कार्य करण्यास प्रत्येकानी तयार असले पाहीजे.

**संदर्भ सुची**


१. खेकाळे ना.रा., जगातील महान राष्ट्रनेते, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर-२००२.

२. पोतदार भारती, महापुरुषांची जीवनगाथा भाग-१, साकेत प्रकाशन, औरंगाबाद-२००९.

३. सदावर्ते विद्याधर, महात्मा गांधीजी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद-२००७.

४. आचार्य धनंजय, गांधीयुग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-२००९.

५. कोठेकर शांता, भारताचे भाग्यविधाते, साईनाथ प्रकाशन, नागपूर-२००८

६. दै. पुण्यनगरी दि. ३०/०१/२०१८.

७. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई-२००६.

८. दै. लोकसत्ता दि. १५/०२/२०१५.

९. गोखले द.ना., गांधीजी मानव नि महामानव, मौजे प्रकाशन गृह, मुंबई-२००८.

१०. गांधी मो. के. सत्याचे प्रयोग, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर-२०१३.

११. भोळे भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन-२००७.

१२. कुंभार नागोराव, महात्मा गांधीचीचे सामाजीक तत्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातुर-२०१२.